महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

दैनिक ठाणे
# जीवनदीप वार्ता

मुंबई ● नवी मुंबई ● ठाणे ● पालघर ● रायगड

कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रविंद्र घोडविंदे (एम.डी.)

बुधवार ■ २५ फेब्रुवारी २०२६ ■ वर्ष - सातवे ■ अंक : २४० ■ RNI No. MAHMAR/2016/7209 ■ किंमत - ०२ रुपये

## संपादकीय

### समतोलाचा शोध
#### दुध दरवाढ : शेतकी दृष्टिकोनातून

दुधाच्या दरात पुन्हा एकदा वाढ झाली आहे आणि ही वाढ केवळ आर्थिक गणितापुरती मर्यादित न राहता सामाजिक वास्तवावर बोट ठेवणारी ठरते. मुंबईसह राज्यातील बहुतांश भागांत १ मार्चपासून पिशवीबंद दुधाच्या दरात प्रति लिटर २ रुपये वाढ लागू होत आहे. उन्हाळ्यामुळे घटलेले उत्पादन, वाढलेले पशुखाद्याचे दर आणि चाऱ्याची टंचाई या सर्व घटकांचा एकत्रित परिणाम म्हणून ही दरवाढ समोर आली आहे. दूध उत्पादक शेतकरी हा या साखळीतील सर्वात दुर्बल घटक आहे. पशुखाद्यांचे दर १५ ते २५ टक्क्यांनी वाढले असताना, पेंड आणि चाऱ्याच्या कृत्रिम टंचाईत शेतकऱ्यांचे उत्पादन खर्च झपाट्याने वाढले आहेत.

अशा स्थितीत खरेदी दरात ४ रुपयांची वाढ करणे अपरिहार्य ठरले. मात्र या वाढीचा संपूर्ण भार ग्राहकांवर न टाकता संस्था आणि वितरक प्रत्येकी १ रुपया स्वतःच्या कमिशनमधून सहन करत आहेत, ही बाब स्वागतार्ह आहे. दुसरीकडे, शहरांमधील तबेल्यांमधून विकल्या जाणाऱ्या दुधाचा दर ९१ रुपयांवरून ९३ रुपये प्रति लिटर करण्यात आला आहे. हा दर ३१ ऑगस्टपर्यंत स्थिर ठेवण्याचा निर्णय जरी दिलासादायक असला, तरी मध्यमवर्गीय आणि निम्न उत्पन्न गटासाठी दुधासारखी मूलभूत गरज महाग होत असल्याची भावना नाकारता येत नाही. या सगळ्या घडामोडी एक महत्त्वाचा प्रश्न उपस्थित करतात— दुधासारख्या अत्यावश्यक अन्नपदार्थाचे दर केवळ बाजाराच्या हवाली सोडून चालतील का? शेतकरी, दूध संघ, वितरक आणि ग्राहक या चौघांमधील समतोल राखण्यासाठी दीर्घकालीन धोरणाची गरज आहे. पशुखाद्य दरांवर नियंत्रण, चारा पुरवठ्याची शाश्वत व्यवस्था आणि दूध उत्पादकांसाठी थेट मदत योजना यांशिवाय दरवाढीचे चक्र थांबणे कठीण आहे. आजची दरवाढ ही केवळ २ रुपयांची नसून, ती ग्रामीण उत्पादनव्यवस्था आणि शहरी उपभोग यांच्यातील ताणाचे प्रतिबिंब आहे. या वास्तवाकडे डोळसपणे पाहून, तात्पुरत्या निर्णयांऐवजी दूरदृष्टीने धोरण आखले गेले, तरच 'दूध' हे पोषणाचे साधन राहील

शेवटी, दुधा दरवाढीकडे केवळ ग्राहकांच्या खिशावर पडलेला भार म्हणून न पाहता ती कृषी–पशुपालन व्यवस्थेतील खोलवर रुजलेल्या असमतोलाचे लक्षण म्हणून पाहणे आवश्यक आहे. उत्पादन खर्च वाढत असताना शेतकऱ्यांना टिकवून ठेवणे आणि एकाच वेळी शहरातील सामान्य कुटुंबांना परवडणारे दर राखणे, हे राज्य आणि धोरणकर्त्यांसमोरचे खरे आव्हान आहे. बाजाराच्या तात्कालिक गरजांवर उपाय शोधण्यापेक्षा, जर चारा, पशुखाद्य आणि दुग्धव्यवसायासाठी ठोस व दीर्घकालीन सार्वजनिक धोरण आखले गेले, तरच दरवाढीच्या प्रत्येक फेरीत समाजाच्या दोन्ही टोकांवर उभे असलेले शेतकरी आणि ग्राहक सुरक्षित राहू शकतील.

भाजप राजवटीतील पहिलाच अर्थसंकल्प
# आज मुंबई मनपाचा अर्थसंकल्प

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**प्रतिनिधी / दि. २४**

**मुंबई :** श्रीमंत महानगरपालिका म्हणून ओळख असलेल्या **मुंबई महानगरपालिका**चा आगामी २०२६–२७ या आर्थिक वर्षाचा अर्थसंकल्प उद्या, २५ फेब्रुवारी रोजी सादर करण्यात येणार आहे. नुकत्याच झालेल्या महापालिका निवडणुकीनंतर नवीन महापालिका, स्थायी समिती आणि शिक्षण समिती स्थापन झाल्याने यंदाचा अर्थसंकल्प विशेष महत्त्वाचा मानला जात आहे. यंदा शिक्षण विभागाचा स्वतंत्र अर्थसंकल्प तसेच एकूण वार्षिक अर्थसंकल्प सादर होणार असून, त्यातून मुंबई महापालिकेची संपूर्ण आर्थिक स्थिती स्पष्ट होणार आहे. गेल्या वर्षी अर्थसंकल्पाचे आकारमान ७४ हजार कोटींहून अधिक होते. यंदा त्यात वाढ होऊन हा फुगवटा ८० हजार कोटींवर जाण्याची शक्यता वर्तवली जात आहे. भाजपच्या सत्तेतील हा पहिलाच अर्थसंकल्प असल्याने राजकीय वर्तुळात उत्सुकता निर्माण झाली आहे. दरवर्षी मुंबई महापालिकेचा अर्थसंकल्प ४ फेब्रुवारी रोजी सादर केला जातो. मात्र यंदा त्या दिवशी महापालिकेची निवडणूक झाल्याने आणि स्थायी समिती अस्तित्वात नसल्याने पालिका प्रशासनाने राज्य सरकारकडे मुदतवाढ मागितली होती. त्यानुसार यावेळी अर्थसंकल्प सादरीकरणाला २० दिवसांचा विलंब झाला आहे.

**■ सादरीकरणाचे वेळापत्रक**

उपलब्ध माहितीनुसार, सकाळी ११ वाजता अतिरिक्त आयुक्त डॉ. अविनाश ढाकणे शिक्षण समितीच्या अध्यक्षा राजश्री शिरवाडकर यांच्याकडे शिक्षण विभागाचा अर्थसंकल्प सादर करतील. दुपारी २ वाजता महापालिका आयुक्त डॉ. भूषण गगराणी स्थायी समितीचे अध्यक्ष प्रभाकर शिंदे यांच्याकडे मुख्य वार्षिक अर्थसंकल्प सादर करणार आहेत. त्यानंतर दुपारी ३.३० वाजता आयुक्तांची पत्रकार परिषद होणार आहे.

**■ सभागृहाचे कामकाज**

अर्थसंकल्प सादर झाल्यानंतर दुपारी ४ वाजता महापालिकेचे सभागृह होणार असून, त्यात १० नामनिर्देशित नगरसेवकांची नेमणूक, वृक्ष प्राधिकरणाची स्थापना व सदस्य नियुक्ती, तसेच विशेष व सल्लागार समित्यांच्या पुनर्घटनेबाबतचे विषय तहकूब करण्याचे कामकाज होणार आहे.



## भाजपकडून राज्यसभेवर कुणाची वर्णी ?

**विनोद तावडेंचं नाव चर्चेत**
**रामदास आठवले यांचे नाव निश्चित**
**कोअर कमिटीच्या बैठकीकडे लक्ष**

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**● प्रतिनिधी / दि. २४**

मुंबई : आगामी राज्यसभा निवडणुकीसाठी भारतीय जनता पक्ष कडून चार उमेदवार उतरवले जाण्याची शक्यता आहे. यापैकी एका जागेसाठी रामदास आठवले यांचे नाव निश्चित झाले असून, उर्वरित तीन उमेदवारांबाबत आज होणाऱ्या भाजपच्या कोअर कमिटी बैठकीत चर्चा होणार आहे. या तीन नावांमध्ये विनोद तावडे, विजया रहाटकर आणि धैर्यशील पाटील यांचा समावेश आहे. यामध्ये विनोद तावडे यांच्या नावाची चर्चा अधिक आहे.

गेल्या काही वर्षांत राष्ट्रीय पातळीवर पक्ष संघटन मजबूत करण्यात तावडे यांनी बजावलेली भूमिका लक्षात घेता, भाजप त्यांना राज्यसभेची संधी देणार का, याकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष आहे. तसे झाल्यास तावडे सक्रिय राजकारणात पुनरागमन करतील.

राज्यसभा निवडणुकीसाठी अर्ज भरण्याची अंतिम तारीख ५ मार्च, छाननी ६ मार्च आणि माघार घेण्याची मुदत ९ मार्च आहे. विधानसभेतील संख्याबळानुसार महाराष्ट्रातील ७ जागांपैकी ६ जागांवर महायुती तर १ जागेवर महाविकास आघाडीचा खासदार निवडून जाण्याची शक्यता आहे.

ठाण्यात पहिल्याच महासभेत
# भाजपकडून सत्ताधारी शिवसेनेची कोंडी

**क्लस्टर व अनुदानांवरून भाजप-शिवसेना आमनेसामने**

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**प्रतिनिधी / दि. २४**

**ठाणे :** ठाणे महापालिकेच्या पहिल्याच सर्वसाधारण सभेत शहरातील क्लस्टर योजना आणि प्रशासकीय कालावधीत शासकीय अनुदानातून झालेल्या विकासकामांवरून सत्ताधारी युतीत तणाव निर्माण झाल्याचे स्पष्ट झाले. सत्तेत सहभागी असलेल्या भारतीय जनता पक्ष यांनीच थेट प्रश्न उपस्थित केल्याने शिवसेना (शिंदे गट) अडचणीत आल्याची चर्चा आहे.

सभेत प्रश्नोत्तर व लक्षवेधी टाळून थेट विषयपत्रिकेचे वाचन सुरू झाल्याने दोन्ही पक्षांमध्ये शाब्दिक वाद झाला. क्लस्टर प्रकल्पासाठी मिळालेल्या १४९ कोटी रुपयांच्या विशेष अनुदानातून नेमकी कोणती कामे झाली, तसेच प्रशासकीय काळात शासनाकडून मिळालेल्या निधीचा सविस्तर लेखाजोखा सादर करण्याची मागणी भाजप नगरसेवकांनी केली. मात्र हे विषय चर्चेला न घेतल्याने भाजप अधिक आक्रमक झाला. यावेळी भाजपच्या उपमहापौरांनी सभागृहात घोषणाबाजी करत सत्ताधाऱ्यांना लक्ष्य केले. क्लस्टर योजना ही एकनाथ शिंदे यांच्यासाठी महत्वाकांक्षी मानली जात असल्याने, या मुद्द्यावरूनच युतीतील मतभेद उघड झाले.

गेल्या ३ वर्षे १० महिने महापालिकेत प्रशासकीय राजवट असताना विकासकामांसाठी मोठ्या प्रमाणात निधी मिळाला होता. त्या निधीच्या वापरावर प्रश्न उपस्थित झाल्याने पहिल्याच सभेत मित्र पक्षाकडूनच सत्ताधाऱ्यांची कोंडी झाल्याचे चित्र दिसून आले. त्यामुळे आगामी काळात ठाणे महापालिकेच्या कारभारात सत्ताधारी युतीतील तणाव वाढण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

भाजपक्ष नगरसेवकांनी क्लस्टरसाठी मिळालेल्या १४९ कोटी विशेष अनुदानासह प्रशासकीय कालावधीतील निधीचा सविस्तर हिशेब सभागृहात मांडण्याची मागणी केल्याने शिवसेना (शिंदे गट) अडचणीत आल्याची चर्चा आहे. हे मुद्दे चर्चेला न घेतल्याने भाजप आक्रमक झाला आणि घोषणाबाजी झाली.

# अंबरनाथ नगर परिषदेचे सहा वर्षांनंतर शिलकी अंदाजपत्रक सादर

**लोकप्रतिनिधींच्या उपस्थितीत पहिलाच अर्थसंकल्प ● करवाढ नाही; पायाभूत सुविधा व शिक्षणावर भर**

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**प्रतिनिधी / दि. २४**

**अंबरनाथ :** सहा वर्षांनंतर अंबरनाथ नगर परिषदेचे लोकप्रतिनिधींच्या उपस्थितीतील अंदाजपत्रक सोमवारी सभागृहात सादर करण्यात आले. आर्थिक वर्ष २०२६–२७ साठी एकूण ७४० कोटी ९० हजार रुपये उत्पन्न आणि ७३९ कोटी ५८ लाख ६२ हजार ६०० रुपये खर्च असे नियोजन करत ४२ लाख २८ हजार ३२० रुपयांचे शिलकी अंदाजपत्रक मांडण्यात आले. विशेष बाब म्हणजे, यंदाच्या अंदाजपत्रकात कोणतीही करवाढ प्रस्तावित करण्यात आलेली नाही. नगर परिषदेच्या मालमत्ता करासह इतर करांमधून २६१ कोटी ९१ लाख रुपये उत्पन्न अपेक्षित आहे. तर राज्य व केंद्र शासनाच्या विविध अनुदानांच्या माध्यमातून परिषदेला ३६६ कोटी ७३ लाख रुपयांचे भांडवली अनुदान मिळणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले.

**● सभागृहात सत्ताधारी गटांत मतभेद**

सहा वर्षांनंतर लोकप्रतिनिधींच्या उपस्थितीत सादर झालेल्या या पहिल्याच अर्थसंकल्पात शिवसेना (शिंदे गट) आणि भारतीय जनता पक्ष यांच्यात अनेक मुद्द्यांवर मतभेद झाल्याचे चित्र दिसून आले. विविध विकासकामांवरून दोन्ही सत्ताधारी गटांमध्ये चर्चेला उधाण आले.




**● आयुध निर्माण संस्थेच्या जागेवरून वाद**

शहरातील आयुध निर्माण संस्थेच्या सुमारे सहा एकर जागेची खरेदी हा मुद्दा विशेष गाजला. या जागेच्या खरेदीबाबत दोन्ही गटांमध्ये तीव्र मतभेद झाले. अखेर चर्चेनंतर या जागेच्या खरेदीसाठी ९ कोटी रुपयांची तरतूद करण्यावर एकमत झाले.

**● शिक्षण व पायाभूत सुविधांवर भर**

अंदाजपत्रकात प्राथमिक शिक्षणासाठी १० कोटी रुपयांची भरीव तरतूद करण्यात आली आहे. यासोबतच शहरातील पायाभूत सुविधांच्या उभारणीसाठी मोठ्या प्रमाणात निधी देण्यात आला आहे.

भुयारी गटार योजना, रस्ते विकास, नालेसफाई व नाला बांधकाम, पाणीपुरवठा सुधारणा, कूपनलिका, तसेच रस्ते सुरक्षा उपाययोजनांसाठी स्वतंत्र तरतुदी करण्यात आल्या आहेत.

**● विकासकेंद्री अंदाजपत्रक**

करवाढ न करता मूलभूत सुविधा, शिक्षण आणि शहराच्या दीर्घकालीन विकासावर लक्ष केंद्रित करणारे हे शिलकी अंदाजपत्रक असल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात आले. आगामी काळात या तरतुदींच्या माध्यमातून अंबरनाथ शहराच्या नागरी सुविधा अधिक सक्षम होतील, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.

## थोडक्यात महत्वाचे

DGCAची कारवाई
### व्हीएसआर व्हेंचर्सची चार विमाने ग्राउंड

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**प्रतिनिधी / दि. २४**

**मुंबई :** बारामती येथे अजित पवार यांचा विमान अपघातात मृत्यू झाल्यानंतर DGCA ने व्हीएसआर व्हेंचर्स या कंपनीच्या चार लिअरजेट ४०/४५ विमाने ग्राउंड करण्याचे आदेश दिले आहेत. विशेष सुरक्षा ऑडिटमध्ये गंभीर नियमभंग आढळल्याने ही कारवाई करण्यात आली. अपघातात अजित पवारसह पाच जणांचा मृत्यू झाला होता, आणि डीजीसीएने भविष्यातील सुरक्षा सुनिश्चित करण्यासाठी तातडीने पावले उचलली आहेत. DGCAच्या या कारवाईमुळे खासगी चार्टर विमान सेवा कंपन्यांना सुरक्षा नियमांचे पालन करण्याबाबत स्पष्ट इशारा मिळाला आहे. अपघातानंतरच्या ऑडिटमध्ये उघड झालेल्या त्रुटी आणि उल्लंघनामुळे, भविष्यात अशा अपघातांची शक्यता कमी करण्यासाठी विमान ऑपरेटरवर कडक देखरेख ठेवणे अनिवार्य असल्याचे डीजीसीएकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

### परीक्षेदरम्यान बत्ती गुल !

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण, ता. २४ :** इयत्ता दहावीच्या पहिल्याच लेखी पेपरला कल्याणमधील अनेक शाळांमध्ये वीजपुरवठा खंडित झाल्याचा प्रकार समोर आला आहे. यामुळे ऐन परीक्षेच्या काळात विद्यार्थ्यांना उकाडा आणि अंधाराचा सामना करावा लागला. या गंभीर प्रकरणाची दखल घेत राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) पक्षाने शिक्षण विभागाकडे तीव्र नाराजी व्यक्त केली. शुक्रवारी (ता. २०) दहावीचा पहिला पेपर सुरू असताना सकाळी ११:३० च्या सुमारास कल्याण-डोंबिवली क्षेत्रातील अनेक शाळांची वीज अचानक खंडित झाली. भरउन्हाळयात पंखे आणि लाईट बंद झाल्याने विद्यार्थ्यांना प्रचंड उकाडा आणि अस्वस्थतेचा सामना करावा लागला. राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) कल्याण पश्चिम विधानसभा कार्याध्यक्ष रुपेश थळे यांनी महापालिका शिक्षण अधिकारी भारत बोरनारे यांची भेट घेऊन निवेदन दिले. वीज गेल्यास शाळांनी इन्व्हर्टर किंवा जनरेटरची पर्यायी व्यवस्था सज्ज ठेवावी. अशी मागणी निवेदनाद्वारे केली आहे.

# मालमत्ता कर थकबाकीदारांना आयुक्त अभिनव गोयल यांचा कडक इशारा

**कामातील हलगर्जीपणासाठी दोन लिपिकांवर निलंबनाची कारवाई!**

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

मालमत्ता कर वसुलीच्या कामात हलगर्जीपणा करणा-या 9/आय प्रभागातील दोन लिपिकांवर आज महापालिका आयुक्त अभिनव गोयल यांनी निलंबनाची कडक कारवाई केली.

मालमत्ता कर वसुलीच्या उददीष्टपुर्तीसाठी कर संकलन विभागातील अधिकारी आणि कर्मचारी यांचेमार्फत अथक प्रयत्न करण्यात येत आहेत. आज आयुक्त अभिनव गोयल यांनी कर वसुलीसंदर्भात समक्ष महानगरपालिकेच्या 9/आय व 10/इ प्रभागात भेट दिली आणि दोन्ही प्रभागांचे सहायक आयुक्त, कर अधिक्षक व कर विभागातील भाग लिपिक यांचे समवेत कर वसुलीबाबत सविस्तर बैठक घेवून, वसुलीच्या सद्यस्थितीबाबत एकंदर आढावा घेतला. सदर बैठकीत भाग लिपिकांशी चर्चेअंती अत्यंत कमी प्रमाणात कर वसुलीस जबाबदार असणा-या 9/आय प्रभागातील भाग लिपिक अरविंद काळण व राजेंद्र पाटील यांचेवर कामातील हलगर्जीपणाबाबत तातडीने निलंबनाची कारवाई करत, कर वसुलीचे उददीष्टपुर्तीसाठी अधिक गांभीर्याने काम करणेबाबत अधिकारी व कर्मचारी वर्गास सक्त निर्देश दिले.

याचवेळी, कर वसुलीसाठी प्रभागात पहाणी करीत असताना कर लावण्यास अटकाव करणा-या सुमारे 4 अनधिकृत अनिवासी मालमत्तावर निष्कासनाची धडक कारवाई देखिल करण्यात आली.

माहे-मार्च हा कर संकलनाचा या आर्थिक वर्षातील शेवटचा महिना असून, कर चुकवेगिरी करणा-यांवर तसेच कर वसुलीच्या कामात जाणीवपुर्वक निष्काळजीपणा दाखविणा-या अधिकारी व कर्मचारी यांचेवर देखिल कडक कारवाई केली जाईल अशी माहिती अतिरिक्त आयुक्त-2 योगेश गोडसे यांनी दिली आहे.

यावेळी, अतिरिक्त आयुक्त-2 योगेश गोडसे, कर विभागाचे उपआयुक्त बाळासाहेब चव्हाण हे आयुक्त अभिनव गोयल यांचेसमवेत उपस्थित होते.




- **मालमत्ता कर थकबाकीदारांना कडक कारवाईचा इशारा ; आयुक्त अभिनव गोयल यांचा थेट हस्तक्षेप**
- **दोन लिपिकांवर तात्काळ निलंबनाची कारवाई**
- **कर वसुलीत दिरंगाई करणाऱ्या कर्मचाऱ्यांवर शिस्तभंगाचे संकेत**
- **प्रभागनिहाय थकबाकीदारांची अद्ययावत यादीचे आदेश**
- **वारंवार थकबाकी ठेवणाऱ्यांवर जप्ती व पाणीपुरवठा खंडित करण्याची तयारी**





# कल्याण-मुरबाड महामार्गावर अपघात

## दुचाकीस्वाराचा मृत्यू



**याठिकाणी अस्तित्वातील स्पीड ब्रेकर काढल्यामुळे वाहनांचा वेग वाढला आहे त्यामुळेच भविष्यात अशा अपघातांची शक्यता अधिक बळावली आहे. हा पूर्णतः रस्ता नियोजन आणि सुरक्षा व्यवस्थेचा प्रश्न असून अशा दुर्दैवी अपघातांना रोखण्यासाठी या ठिकाणी स्पीड ब्रेकर आणि इतर रस्ता सुरक्षा उपाय करणे गरजेचे आहे!**

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : आज सकाळीच कल्याण मुरबाड महामार्गावर म्हारळपाडयाजवळ थारवानी समोर डंपर च्या मागच्या चाकाखाली मोटारसायकल स्वार आल्याने या अपघातात तो जागीच ठार झाल्याची दुर्दैवी घटना घडली, विशेष म्हणजे हे मयत वरप येथील आपल्या नातेवाईकांकडे वर्षश्राध्द च्या कार्यक्रमासाठी आल्याची माहिती मिळत आहे. या मार्गावर मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी झाल्याने पोलिसांनी क्रेन बोलावून डंपर बाजूला सारून मृतदेह काढण्याचा प्रयत्न केला, या हृदय द्रावक घटनेने सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे. आज सकाळी रेती खडीचा डंपर क्रमांक एम एच०५,जी ऐ ६७८९हा कांबा गावाकडून बिर्लागेट दिशेने जात असताना म्हारळपाड जवळील थारवानी येथे मोटारसायकल क्रमांक एम एच ० ईपी १०४७ ला अपघात झाला, हा इतका भयानक होता की ४०वर्षीय या इसमाचा अक्षरशः चेंदामेंदा झाला होता. तो वरप येथे नातेवाईकांकडे वर्षश्राध्द साठी आला होता व त्यासाठी लागणारे साहित्य आणण्यासाठी जात असताना ही दुर्दैवी घटना घडल्याची माहिती मिळत आहे. पोलिसांनी हा डंपर काढण्यासाठी कांबा येथून क्रेन बोलावून हा मृतदेह बाहेर काढला, त्यामुळे या रस्त्यावर वाहतूक कोंडी झाली होती. दरम्यान या रस्त्यावर स्पीड ब्रेकर आहेत, परंतु काही ठिकाणी ते काढण्यात आल्याने तेथून गाड्या सुसाट वेगाने जात असल्याने अशा अपघाताच्या घटना वाढत आहेत.

# डॉ. श्रीकांत शिंदे पुन्हा करणार आंतरराष्ट्रीय स्तरावर भारताचे नेतृत्व

**लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांच्या पुढाकाराने स्थापन करण्यात आलेल्या 'पार्लमेंटरी फ्रेंडशिप ग्रुप'मध्ये डॉ. श्रीकांत शिंदे यांची नियुक्ती**



## इंडोनेशिया येथे जाणाऱ्या शिष्टमंडळाचे करणार नेतृत्व

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : ऑपरेशन सिंदूरच्या शिष्टमंडळामधील सक्रिय आणि यशस्वी सहभागानंतर कल्याण लोकसभा मतदारसंघाचे शिवसेना खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांना आंतरराष्ट्रीय स्तरावर भारताचे पुन्हा एकदा नेतृत्व करण्याची एक महत्वाची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांच्या पुढाकाराने स्थापन करण्यात आलेल्या 'पार्लमेंटरी फ्रेंडशिप ग्रुप'मध्ये डॉ. शिंदे यांचीही निवड करण्यात आली आहे. याअंतर्गत विविध शिष्टमंडळ स्थापन करण्यात आले असून यातील इंडोनेशिया देशाचा दौरा करणाऱ्या शिष्टमंडळाचे नेतृत्व हे खासदार डॉ.श्रीकांत शिंदे करणार आहेत. ऑपरेशन सिंदूरअंतर्गत विविध पक्षांचे खासदार एकत्र येत भारताचे एकसंघ प्रतिनिधित्व जगासमोर मांडत होते. यावेळी खासदार डॉ.श्रीकांत शिंदे यांनी एका शिष्टमंडळाचे नेतृत्व केले होते. यावेळी त्यांनी यूएई, सिएरा लिनोन, लायबेरिया, डीआर काँगो या देशांमध्ये भेट दिली होती. आणि ऑपरेशन सिंदुरबाबत भारताची भूमिका या सर्व देशांमध्ये ठामपणे मांडली होती. त्याच धर्तीवर आता पार्लमेंटरी फ्रेंडशिप ग्रुप्सच्या माध्यमातून जागतिक पातळीवर भारताची संसदीय कूटनीती अधिक मजबूत करण्याचा हा महत्त्वाचा प्रयत्न केला जात आहे. भारताचे विविध देशांशी संसदीय संबंध अधिक दृढ करण्याच्या उद्देशाने हा महत्त्वाकांक्षी उपक्रम राबवण्यात येत आहे. याअंतर्गत विविध पक्षांतील खासदारांचा समावेश असलेली शिष्टमंडळे ६० हुन अधिक देशांचा दौरा करणार आहे.

या दौऱ्यादरम्यान व्यापार, तंत्रज्ञान, शिक्षण, सांस्कृतिक देवाणघेवाण आणि द्विपक्षीय सहकार्य या विषयांवर सखोल चर्चा केली जाणार आहे. यामध्ये रविशंकर प्रसाद, पी. चिदंबरम, राम गोपाल यादव, टी.आर. बालू, सुप्रिया सुळे, शशी थरूर, अनुराग ठाकूर, असदुद्दीन ओवैसी, अखिलेश यादव, डेरेक ओ'ब्रायन, मनीष तिवारी, अभिषेक बॅनर्जी, कणिमोळी, गौरव गोगोई यांसारख्या दिग्गज नेत्यांपासून ते डॉ.श्रीकांत एकनाथ शिंदे यांच्या सारख्या युवा खासदारांपर्यंत व्यापक प्रतिनिधित्व या गटांमध्ये दिसून येत आहे. यामध्ये इंडोनेशिया, श्रीलंका, जर्मनी, न्यूझीलंड, स्वित्झर्लंड, दक्षिण आफ्रिका, भूतान, सौदी अरेबिया, इस्रायल, मालदीव, अमेरिका, रशिया, युरोपियन संसद सदस्य देश, दक्षिण कोरिया, नेपाळ, युनायटेड किंगडम, फ्रान्स, जपान, इटली, ऑस्ट्रेलिया, ग्रीस, सिंगापूर, ब्राझील, व्हिएतनाम, मेक्सिको, इराण आणि यूएई अशा विविध महत्त्वाच्या देशांसोबत संवाद साधला जाणार आहे.

# 'मन की बात' हा केवळ कार्यक्रम नाही, तर राष्ट्रनिर्मितीची प्रेरणा

## – भाजप नगरसेविका हेमलता पवार



**"कल्याण पश्चिमेतील बूथ क्रमांक 100 वर थेट प्रक्षेपणाचे आयोजन"**

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या 'मन की बात' या लोकप्रिय संवाद कार्यक्रमाच्या १३१ व्या भागाचे थेट प्रक्षेपण कल्याण पश्चिमेतील सहकार मंदिर हॉल, आग्रा रोड येथे बूथ क्रमांक १०० वर उत्साहात पार पडले. हा कार्यक्रम भाजप नगरसेविका हेमलता पवार यांच्या माध्यमातून आयोजित करण्यात आला होता.

या भागामध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 'AI इम्पॅक्ट समिट'मधील यशस्वी कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) प्रकल्प, टी-२० वर्ल्ड कपमध्ये झळकणाऱ्या भारतीय वंशाच्या खेळाडूंचे योगदान, तसेच अवयवदानाचा आदर्श ठेवणाऱ्या एका चिमुकलीची प्रेरणादायी कथा यांसारख्या विविध विषयांवर भाष्य केले. यासोबतच बँकिंग क्षेत्रातील KYC प्रक्रियेचे महत्त्व अधोरेखित करत नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहनही त्यांनी केले. विशेषतः अवयवदानासारख्या संवेदनशील विषयावर बोलताना समाजात जागरूकता निर्माण करण्याचे आवाहनकरत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मानवतेचाही संदेश दिला.

, तर मन की बात' हा आता केवळ एक कार्यक्रम राहिला नसून तो राष्ट्रनिर्मितीची प्रेरणा बनला आहे. या माध्यमातून प्रत्येक नागरिकामध्ये सकारात्मक विचारांची दिशा निर्माण होते आणि देशहितासाठी योगदान देण्याची जाणीव होत असल्याची भावना भाजपा नगरसेविका हेमलता नरेंद्र पवार यांनी या कार्यक्रमानंतर व्यक्त केली. तसेच अशा कार्यक्रमाच्या माध्यमातून नागरिकांमध्ये राष्ट्रभावना, सामाजिक जबाबदारी आणि सकारात्मक विचारसरणी बळकट होत असल्याचे मतही त्यांनी व्यक्त केले.याप्रसंगी भाजप पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित राहून पंतप्रधान मोदी यांच्या विचारांना उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. कार्यक्रमादरम्यान उपस्थितांनी देशाच्या विविध घडामोडींवर आधारित पंतप्रधानांचा संवाद एकाग्रतेने ऐकला.दरम्यान या मन की बात कार्यक्रम प्रक्षेपणानंतर त्याच ठिकाणी भाजपच्या "कार्यकर्ता टिफीन बैठकीचे"ही आयोजन करण्यात आले होते. ज्यामध्ये देशातील नरेंद्र मोदी सरकार आणि राज्यातील देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील महायुती सरकारच्या माध्यमातून सुरू असलेल्या विविध महत्वाकांक्षी विकासकामांचा तसेच कल्याणकारी योजनांवर चर्चाही करण्यात आली. तसेच ही सर्व विकासकामे आणि योजना प्रत्येक नागरिकांपर्यंत पोहचवण्याचे आवाहन करण्यात आले.

# कल्याण पंचायत समितीत पाणीपुरवठा विभागातच संत गाडगेबाबा जयंती साजरी



**इतर विभाग शांत?**

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : अंगावर फाटके कपडे आणि हातात खराटा घेऊन ज्यांनी आयुष्यभर अस्वस्थता, अंधश्रद्धा, अनिष्ट रुढी-परपंरा, व व्यसनाधीनता या विरुद्ध लढा दिला, गोपाला, गोपाला देवकीनंदन गोपाला,अशा किर्तनातून'माणसातच देव, शोधण्याची शिकवण दिली, त्यांच्या अतुलनीय कार्यामुळे त्यांना आधुनिक संत आणि 'समाजसुधारक,म्हणून ओळखले जाते. याहूनही महत्त्वाचे त्यांच्या सन्मानार्थ'महाराष्ट्र सरकार, संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान राबवते. यामुळे संपूर्ण राज्यात २३ फेब्रुवारी हा दिवस त्यांची जयंती साजरी केली जाते, असे असताना कल्याण पंचायत समितीमध्ये मात्र केवळ पाणी पुरवठा विभागाच्या ३ ते ४ कर्मचाऱ्यांनी साजरी केली, यावरून इतर विभागांना या राष्ट्र संताचे वावडे आहे का?असा प्रश्न उपस्थित केला जात आहे विशेष म्हणजे प्रशासनाचे प्रमुख असलेले गटविकास अधिकारी देखील अनुपस्थित राहिल्याने सामाजिक कार्यकर्ते मध्ये संताप पसरला आहे. महाराष्ट्र शासनाच्या सामान्य प्रशासन विभागातर्फे दरवर्षी राष्ट्र पुरुष, थोर व्यक्ती, आणि संत यांच्या जंयती व राष्ट्रीय दिन साजरे करण्याबाबतचे परिपत्रक जारी केले जाते. मंत्रालयापासून ते स्थानिक, शासकीय/निमशासकीय कार्यालयामध्ये साजरे करण्याचे आदेश आहेत. असे असताना २३ फेब्रुवारी रोजी कल्याण पंचायत समितीच्या केवळ पाणी पुरवठा विभागात संत गाडगेबाबा यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून जंयती साजरी करण्यात आली, यामध्ये केवळ याच कार्यालयातील ३ ते ५ कर्मचारी सहभागी झाले होते. कल्याण पंचायत समितीमध्ये, ग्रामपंचायत, शिक्षण, आरोग्य, पशुसंवर्धन, लेखा, बालविकास, बांधकाम, कृषी, लघुपाटबंधारे, असे १० ते १२ विभाग असताना एकही कर्मचारी, अधिकारी इकडे फिरकले नाहीत, इतरांचे सोडा पण दस्तुरखुद्द गटविकास अधिकारी श्री गवारी यांना देखील आधुनिक संत, समाजसुधारक, गाडगेबाबा यांना अभिवादन करावेसे वाटले नाही, याचे आश्चर्य वाटलं. हातात झाडू घेऊन गावोगावी फिरून गोरगरीब, दिनदलित, यांच्यातील अज्ञान, अंधश्रद्धा, शिक्षण, चारित्र्य याची शिकवण दिली त्या संतांच्या बाबतीत असे घडावे हे दुर्लक्षित करुन चालणार नाही,४० ते ५० कर्मचारीअसलेल्या पंचाईत समितीमध्ये केवळ३-४कर्मचाऱ्यांनी अशी जंयती साजरी करावी दुर्दैव म्हणावे की जाणूनबुजून केलेली'चूक,?एरवी ११:४५ शिवाय पंचायत समितीमध्ये येणारे हे अधिकारी व कर्मचारी यांनी कोणी जाब विचारणार आहे की नाही?

# सरळगाव परिसरात वाहनाच्या धडकेत कोल्ह्याचा मृत्यू



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**मुरबाड** : मुरबाड तालुक्यातील सरळगाव-किन्हवली रस्त्यावरील विसावा रिसॉर्ट परिसरात सोमवारी सकाळी रस्त्याच्या कडेला एक मृत कोल्हा आढळून आल्याने परिसरात खळबळ उडाली. घटनेची माहिती मिळताच वन विभागाचे ज्येष्ठ वनपाल नारायण भांगरे, वनरक्षक गजानन मुसळे व वनमजूर अर्जुन फोडसे तात्काळ घटनास्थळी दाखल झाले व मृत प्राण्याचा मृतदेह ताब्यात घेऊन पुढील वैद्यकीय तपासणीसाठी पशुवैद्यकीय विभागाकडे पाठविला. पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांनी केलेल्या शवविच्छेदनात सदर प्राणी कोल्हा प्रजातीतील प्रौढ नर असल्याचे स्पष्ट झाले. वाहनाच्या जबर धडकेमुळे त्याला गंभीर दुखापत झाली असून, अपघातात त्याचा पुढील डावा पाय मोडल्याचे निष्पन्न झाले. धडक इतकी तीव्र होतो की, त्यातच त्याचा मृत्यू झाल्याचा निष्कर्ष वैद्यकीय तपासणीतून काढण्यात आला. सदर घटना रविवारी रात्रीच्या सुमारास घडली असावी, असा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात आला आहे.

या प्रकरणी मुरबाड पूर्व परिक्षेत्राचे वनक्षेत्रपाल महेशकुमार शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली पुढील कारवाई वन्यजीव संरक्षण कायद्यान्वये व शासकीय नियमानुसार सुरू असल्याची माहिती वन कर्मचारी दिगंबर शिंगोळे यांनी दिली.

या घटनेच्या पार्श्वभूमीवर मुरबाडच्या पूर्वेकडील गवताळ परिसंस्थेवर अवलंबून असलेले वन्यजीव, तसेच अलीकडे वाढत चाललेले 'वन्यजीव वाहन अपघात' याकडे गांभीर्याने पाहण्याची गरज निर्माण झाली आहे. नैसर्गिक अधिवासात वाढती मानवी वर्दळ, वेगवान वाहतूक, रस्ते बांधकाम आणि अधिवासातील बदल यामुळे वन्यजीव रस्त्यांवर येण्यास भाग पाडले जात असल्याचे तज्ज्ञांचे मत आहे. यामुळे केवळ वन्यजीवांचे जीव धोक्यात येत नसून परिसंस्थेचा समतोलही बिघडत आहे. मात्र वाहतूकीचे रस्ते वन्यजीवांच्या नैसर्गिक अधिवासातून जात आहेत का? अधिवासातील अन्नसाखळी विस्कळीत होत आहे का? वाढती मानवी वर्दळ, वेगवान वाहतूक व प्रकाशप्रदूषण यामुळे वन्यजीव रस्त्यांवर येण्यास भाग पाडले जात आहेत का? असे अनेक प्रश्न यानिमित्ताने उपस्थित होत आहेत.

वन्यजीव संरक्षण कायद्यानुसार वन्यप्राण्यांचे संरक्षण, त्यांच्या अधिवासाचे जतन व संवर्धन करणे ही शासनाची कायदेशीर जबाबदारी आहे. त्यामुळे अशा अपघातप्रवण मार्गांवर वेगमर्यादा फलक, 'वन्यजीव मार्ग' चेतावणी फलक, स्पीड ब्रेकर, तसेच दीर्घकालीन उपाययोजना म्हणून वन्यजीवांसाठी सुरक्षित कॉरिडॉर उभारण्याची आवश्यकता असल्याची मागणी नागरिक व पर्यावरणप्रेमींमधून होत आहे. ही घटना केवळ एका कोल्ह्याच्या मृत्यूपर्यंत मर्यादित नसून, निसर्ग आणि विकास यांच्यातील विसंगतीचा इशारा देणारी आहे. वेळेत उपाययोजना न झाल्यास भविष्यात अशा घटनांची पुनरावृत्ती होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

# मुरबाड मधील सचिन लॉज येथे दरोड्याचा प्रयत्न

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**मुरबाड** : मुरबाड-कल्याण राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६१ लगत वांजळे परिसरात असलेल्या सचिन लॉज येथे जबरी दरोड्याचा प्रयत्न करण्यात आला होता. मात्र नागरिकांच्या सतर्कतेमुळे आणि पोलिसांच्या तत्पर कारवाईमुळे हा प्रकार उधळून लावण्यात आला. या प्रकरणी दोन संशयितांना अटक करण्यात आली असून अन्य तीन आरोपी फरार असून त्यांचा शोध सुरू असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

याबाबत लॉजच्या मालकीण संगीता चौहान यांनी मुरबाड पोलीस ठाणे येथे तक्रार दाखल केली आहे. तक्रारीनुसार, दि. २२ फेब्रुवारी रोजी सकाळी सव्वा अकराच्या सुमारास पाच जण ग्राहक असल्याचा बहाणा करून लॉजमध्ये दाखल झाले. काही वेळातच त्यांनी कोयता व अन्य शस्त्रांचा धाक दाखवून संगीता चौहान व त्यांच्या मुलीला दोराने बांधून ठेवले आणि सोन्याच्या आठ बांगड्या, एक सोन्याची चैन, दोन अंगठ्या तसेच तीन मोबाईल असा सुमारे चार लाख रुपयांचा ऐवज घेऊन पळ काढला. घटनेनंतर नागरिकांनी पाठलाग करत पोटगाव परिसरात दोन संशयितांना पकडून पोलिसांच्या ताब्यात दिले, तर उर्वरित तीन जण पळून जाण्यात यशस्वी ठरल्याचे सांगितले.

या प्रकरणी रात्री उशिरा गुन्ह्याची नोंद करण्यात आली असून भारतीय दंड संहिता कलम ३१० (२), ३११ व ६१ (२) अन्वये कारवाईला सुरुवात करण्यात आली आहे. पोलिसांनी आरोपींकडून पाच सोन्याच्या बांगड्या, दोन अंगठ्या, तीन मोबाईल तसेच गुन्ह्यात वापरलेल्या दोन मोटारसायकली जप्त केल्या आहेत. अटक करण्यात आलेले सौरभ प्रवीण डायरे आणि ओजस विनेश मोहिते यांना न्यायालयात हजर केले असता २७ फेब्रुवारीपर्यंत पोलिस कोठडी सुनावण्यात आली आहे.

फरार तीन आरोपींच्या शोधासाठी पोलिसांची तीन पथके कार्यरत असून लवकरच त्यांना अटक करण्यात येईल, अशी माहिती पोलिस सूत्रांनी दिली. या घटनेचा तपास वरिष्ठ पोलिस निरीक्षक दादासाहेब एडके यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस उपनिरीक्षक श्याम आरमळकर व त्यांची टीम करत असून परिसरातील वाढत्या घरफोड्या व दरोड्यांच्या घटनांबाबत नागरिकांकडून चिंता व्यक्त केली जात आहे.

# राजाभाऊ सरनोबत यांच्याकडे मुरबाड कामगार सेनेची जबाबदारी



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**मुरबाड** : हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या आशीर्वादाने व शिवसेना पक्षप्रमुख तथा माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या आदेशानुसार, युवा सेना प्रमुख आदित्य ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली मुरबाड तालुक्यातील ज्येष्ठ कार्यकर्ते राजाभाऊ सरनोबत यांची शिवसेना कामगार सेना तालुका अध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे.

शिवसेना उपनेते विजय (बंड्या) साळवी यांच्या सहकार्याने व जिल्हा प्रमुख अल्पेश भोईर यांच्या मार्गदर्शनाखाली ही महत्त्वपूर्ण निवड जाहीर करण्यात आली. शिवसेना उपजिल्हाप्रमुख मधुकर (अप्पा) घुडे व शिवसेना मुरबाड तालुका प्रमुख संतोष विशे यांच्या सहीने सरनोबत यांना अधिकृत नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले.या प्रसंगी शिवसेना सचिव बाळा (तानाजी) चौधरी, विधानसभा समन्वयक गुरुनाथ भावार्थे, मुरबाड तालुका सचिव अजित इसामे यांच्यासह तालुक्यातील अनेक पदाधिकारी, शाखाप्रमुख, महिला आघाडी व युवा सेनेचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. घोषणाबाजी, फटाक्यांची आतषबाजी आणि जल्लोषात सरनोबत यांच्या निवडीचे स्वागत करण्यात आले.

राजाभाऊ सरनोबत हे गेली अनेक वर्षे सक्रीय समाजकारणात असून ते सक्रिय ज्येष्ठ कार्यकर्ते आहेत. त्यांनी संघटनेच्या वतीने कामगार, बांधकाम मजूर, औद्योगिक कामगार व कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या प्रश्नांवर सातत्याने आवाज उठवत आहेत. संघटनात्मक बांधणी, आंदोलनात्मक भूमिका आणि तळागाळातील कार्यकर्त्यांशी घट्ट नाते यामुळे त्यांना तालुक्यात विशेष ओळख आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली कामगार सेनेला नवसंजीवनी मिळेल, असा विश्वास पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला. नियुक्तीनंतर बोलताना राजाभाऊ सरनोबत म्हणाले की, "मुरबाड तालुक्यातील सर्व कामगारांच्या न्याय हक्कांसाठी ठामपणे उभे राहू. वेतन, सुरक्षा, विमा, ईएसआय, पीएफ तसेच कंत्राटी कामगारांच्या प्रश्नांवर संघटित लढा उभारू. प्रत्येक कामगारापर्यंत शिवसेना कामगार सेनेचे जाळे पोहोचवून संघटना अधिक बळकट करू."या निवडीमुळे मुरबाड तालुक्यात शिवसेना कामगार सेनेच्या कार्याला वेग येणार असून आगामी काळात विविध कामगार मेळावे, जनजागृती मोहिमा व आंदोलनात्मक कार्यक्रम हाती घेण्यात येणार असल्याची माहिती पदाधिकाऱ्यांनी दिली. राजाभाऊ सरनोबत यांच्या नेतृत्वाखाली कामगारांच्या न्याय हक्कांची लढाई अधिक तीव्र होणार, अशी भावना कार्यकर्त्यांमध्ये व्यक्त होत आहे.

# भविष्यवेध



बुधवार
२५ फेब्रुवारी २०२६

**मेष**
लोकांच्या मॅटरमध्ये लक्ष घालू नका, पश्चातापाची वेळ येईल. जुन्या गोष्टींमध्ये अडकणे टाळावे. व्यवसाय वाढवण्यासाठी काही नवीन मार्गांचा विचार कराल.

**वृषभ**
छोट्या छोट्या गोष्टींवरून रागावल्याने काही लोक तुमचा विरोध करू शकतात, म्हणून तुम्ही तुमचा राग नियंत्रित करावा. प्रेमी एकमेकांच्या भावना समजून घेतील.

**मिथुन**
तुमचे विचार वडिलांसोबत नक्की शेअर करा; यामुळे समोर येणाऱ्या कोणत्याही समस्या सोडवण्यास मदत होईल. एकत्र काम केल्याने लक्षणीय यश मिळेल.

**कर्क**
तुमच्या कुटुंबाकडून तुम्हाला गुंतवणुकीचा चांगला सल्ला मिळेल. कामाच्या ठिकाणी बदल केल्याने तुमच्या उर्जेत बदल होईल. तुम्हाला नशीबाची पूर्ण साथ मिळेल.

**सिंह**
तुमचे मन देवाच्या भक्तीवर केंद्रित असेल आणि तुम्ही एखाद्या मंदिरात जाऊ शकता जिथे तुम्हाला आनंद मिळेल. तुम्ही तुमच्या कारकिर्दीत नवीन उंची गाठाल.

**कन्या**
कुटुंबातील एखाद्या सदस्याला सरकारी नोकरी मिळाल्याने आनंदी वातावरण राहील. कोणाच्याही प्रभावाखाली येऊ नका आणि आजच गुंतवणूक करा.

**तुळ**
जोडीदाराचा सल्ला कोणत्याही प्रयत्नात फायदेशीर ठरेल. कामाची प्रशंसा होईल. उत्पन्नाचे नवीन स्रोत उदयास येतील आणि आर्थिक परिस्थिती मजबूत राहील.

**वृश्चिक**
कला आणि साहित्य क्षेत्रात रस असेल. आर्थिक बाबतील आई-वडिलांचे मार्गदर्शन, सहाय्य मिळेल. प्रेमी जोडप्यांना घरी होकार मिळू शकतो.

**धनु**
व्यवसायात पैसे गुंतवण्यापूर्वी वडिलांचा सल्ला घेणे शहाणपणाचे ठरेल. वडिलांचे आशीर्वादाने संपत्ती वाढेल. वडील मुलांच्या इच्छा पूर्ण करण्याचा प्रयत्न करतील.

**मकर**
नवीन व्यवसाय सुरू करायचा आहे ते आज बाजाराचे विश्लेषण चांगले करतील. एखाद्या नातेवाईकाकडून चांगली बातमी मिळेल. तुमच्या घरात सुसंवाद येईल.

**कुंभ**
तुमचा जोडीदार तुम्ही जे काही बोलता ते समजून घेण्याचा प्रयत्न करेल, ज्यामुळे नात्यात ताजेपणा येईल. भावंडांसोबत घरी चित्रपट पाहण्याची योजना कराल.

**मीन**
भौतिक सुखसोयी वाढतील. विद्यार्थी आज काहीतरी नवीन करण्याचा प्रयत्न करतील आणि तुम्हाला तुमच्या दैनंदिन दिनचर्येत काही बदल करावे लागतील.

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

https://www.facebook.com/jeevandeepnews/
https://www.instagram.com/thane_jeevandeep/
https://x.com/Jeevandeepvarta
https://jeevandeepvarta.com/



# मध्य रेल्वे प्रकल्पातील भूसंपादित क्षेत्रावर अनधिकृत बांधकामे

## वंचित बहुजन आघाडीची कारवाईची मागणी

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण :** मध्य रेल्वे लोहमार्ग चौपदरीकरण व रेल्वेउड्डाणपूल भूसंपादन प्रक्रीयेत आधीसुचना दिल्यानंतर बेकायदेशीर काही ठिकाणी दोन तर काही ठिकाणी तीन मजली इमारती तर काही ठिकाणी बैठी चाळी बांधकामे करुन करोडो रुपये उकळण्याचा दलालांचा भ्रष्ट प्रयत्न सुरु असल्याचा आरोप वंचित बहुजन आघाडीने केला आहे. कल्याण तालुक्यातील मौजे - खडवली आणि मौजे पितांबरे गांव या ठिकाणी कल्याण-कसारा मध्य रेल्वे लोहमार्ग चौपदरीकरण व रेल्वेउड्डाणपूल भूसंपादनाच्या प्रकीयेचे कामकाज प्रस्तावीत असून ते लवकरच सुरु केले जाणार असल्याची आगाऊ माहिती संबंधीत भूसंपादन यंत्रणेकडून स्थानिक दलालांना देण्यात आली आहे. त्यामुळे या प्रकल्पाकामी खडवली रेल्वे स्थानकाच्या पुर्व व पश्चिम स्थानका लगत प्रस्तावित भूसंपादित होणाऱ्या जागेवर फक्त एका आठवडयात, सुमारे २०० ते २५० बांधकाम मजूरांना कामास घेऊन काही ठिकाणी दोन मजली, काही ठिकाणी तीन मजली अशा अनेक इमारतींचे बांधकाम केल्याचे धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे.

त्याअनुषंगाने या बांधकामाचे होणारे मुल्यांकन हे करोडोंच्या स्वरुपात आहे, तरी हे करोडो रुपये भ्रष्ट मार्गाने लाटण्यासाठी संबंधीत भूसंपादन अधिकारी, स्थानीक दलाल आणि जागामालक यांनी आपसात संगनमत करुन हे बेकायेदशीर अनधिकृत बांधकामे केली असल्याचा आरोप वंचित बहुजन आघाडीचे ठाणे जिल्हा उपाध्यक्ष दिलीप भोईर यांनी केला आहे.

याबाबत भोईर यांनी संबंधीत वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे तक्रार दाखल केली आहे. या प्रकरणात होणारी करोडो रुपयांच्या भ्रष्टाचाराची वरिष्ठ स्तरावर चौकशी होऊन तात्काळ दोषी व्यक्तीं विरोधात फौजदारी स्वरुपाची कारवाई करण्यात यावी तसेच या दोन मजली, तीन मजली इमारतीच्या अनधिकृत बांधकामांना संबंधीत नियोजन प्राधिकरण ठाणे, बांधकाम विभाग यांची कोणतीही बांधकाम परवानगी न घेता करण्यात आलेल्या बेकायदेशीर बांधकामांना मोबदला अदा करण्यात येऊ नये अशी मागणी केली आहे.

वारंवार तक्रार करुनही भुसंपादन अधिकारी यांनी त्यावर कुठलीही कारवाई न करता उलट बेकायदेशीर बांधकाम करणारे गुन्हेगार व्यक्तींना सहकार्य करत असून बेकायदेशीर बांधकामांना मोबदला देणे संबंधीत कारवाई चालु आहे. त्यांच्या निदर्शनाखाली होणाऱ्या बांधकामाचे मुल्यांकन बनविण्याकरिता बांधकामाला बांधकाम नंबर देण्यात आलेले आहेत, यावरुन भुसंपादन अधिकारी यांचा गुन्हेगारांना पुर्णपणे पाठींबा असल्याची शक्यता नाकारता येत नसल्याचे दिलीप भोईर यांनी सांगितले.

# भिवंडीत जुन्या वादातून बेदम मारहाण

## पाच जणांविरोधात गुन्हा दाखल ■ मारहाणीचा व्हिडीओ समाज माध्यमावर

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**भिवंडी (प्रतिनिधी)**

**अनधिकृत इमारत बांधकामा बाबत तक्रार केल्याच्या वादातून भिवंडी महापालिका प्रभाग समिती क्रमांक चार कार्यालय प्रांगणात एका व्यक्तीस पाच जणांच्या टोळक्याने बेदम लाथाबुक्क्यांनी मारहाण केल्याची खळबळजनक उघडकीस असुन त्यास तातडीने खाजगी रूग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे.मारहाणीचा व्हिडीओ समाज माध्यमावर प्रसिद्ध झाल्याने सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात आहे. पोलिसांनी या प्रकरणी दखल घेत मारहाण करणाऱ्या इसमां विरोधात संबंधीतावर गुन्हा दाखल केला आहे.**



मोहम्मद मन्सूर अन्सारी (59 रा.भिवंडी.) असे मारहाण झालेल्या व्यक्तीचे नाव आहे.ते महापालिका प्रभाग समिती क्रमांक चार कार्यालय येथे एक तक्रार अर्ज देण्यासाठी गेले होते.त्यावेळी तेथे त्यांच्याशी झालेल्या जुन्या वादातून त्याठिकाणी आलेल्या पाच जणांच्या टोळक्याने त्यास दुचाकी वरून खाली पडून त्यास बेदम मारहाण केली आहे.या प्रकरणी मन्सूर अन्सारी यांनी जवळच्या महापालिका कॅबिन मध्ये धाव घेतल्याने त्यांचा जीव बचावला आहे.या मारहाणी नंतर कुटुंबियांच्या मदतीने स्व.इंदिरा गांधी स्मृती रुग्णालय येथे प्रथमोपचार करून खाजगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे.

या मारहाणीत मन्सूर यांचा हात फॅक्चर झाला आहे.सायंकाळी उशिरा मन्सूर अन्सारी यांनी दिलेल्या तक्रारी वरून भोईवाडा पोलिस ठाण्यात नियाज सिद्दिकी,फिरोज मेमन,कासिम सिद्दिकी,अली व एक अज्ञात व्यक्ती अशा पाच जणां विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.याप्रकरणी नियाज सिद्दिकी यास पोलिसांनी अटक केली आहे.मन्सूर अन्सारी यांनी नियाज सिद्दिकी यांच्या अनधिकृत बांधकामा संदर्भात तक्रार दिली होती.त्यावरून काही महिन्यांपासून वाद सुरू होता.

# धक्कादायक : भिवंडीत बालमजुरीचा गुन्हा उघड

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**प्रतिनिधी / दि. २४**

**भिवंडी :** भिवंडीतील निजामपुरा पोलिस ठाणे हद्दीत एका वडापाव दुकानात १२ वर्षांच्या अल्पवयीन मुलाला धोकादायक परिस्थितीत काम करण्यास भाग पाडल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी पोलिसांनी संबंधित दुकानमालकाविरुद्ध बालमजुरीचा गुन्हा दाखल केला असून तपास सुरू आहे. पोलिसांच्या माहितीनुसार, २१ फेब्रुवारी रोजी रात्री ८ वाजता मिठपाडा रोडवरील आदित्य हॉटेलजवळील वडापाव दुकानात तपासणी करण्यात आली. यावेळी एक अल्पवयीन मुलगा गॅस स्टोव्हजवळ गरम तव्यावर बटाटेवडे तळताना आढळून आला. चौकशीत त्याने आपले वय १२ वर्षे असल्याचे सांगितले. तो गेल्या दोन महिन्यांपासून दुकानात काम करत असून, त्याला दररोज सुमारे २५० रुपये मजुरी दिली जात होती.

दुकानमालक रियाज अब्दुल रौफ सिद्दीकी (२२) याने अल्पवयीन मुलाला कामावर ठेवून गरम तेल व गॅस चुलीजवळ काम करायला लावल्याने त्याच्या जीवाला व सुरक्षिततेला गंभीर धोका निर्माण झाला होता. याप्रकरणी निजामपुरा पोलिसांनी बालकामगार (प्रतिबंधक) कायदा आणि बाल न्याय कायद्याच्या संबंधित कलमांखाली गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू असल्याचे पोलिसांनी सांगितले. या प्रकारामुळे बालमजुरीसारख्या गंभीर सामाजिक समस्येचे भीषण वास्तव पुन्हा समोर आले असून, अल्पवयीन मुलांच्या सुरक्षिततेकडे दुर्लक्ष करणाऱ्यांवर कठोर कारवाईची गरज अधोरेखित झाली आहे.

# बदलापूरमध्ये 'शिवशंभु शौर्यगाथा' संपन्न

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**
**बदलापूर, ता. २४**

सकल मराठा समाज हितवर्धक मंडळाच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराजांच्या ३९६व्या जयंतीनिमित्त बदलापूर पूर्वेतील कार्मेल शाळेजवळील मैदानात 'शिवशंभु शौर्यगाथा' या नाट्यमय ऐतिहासिक कार्यक्रम दिमाखात पार पडला. या भव्य नाट्यप्रयोगात घोडे, उंट, बैलगाड्यांचा प्रत्यक्ष वापर करून युद्धप्रसंग साकारण्यात आले. जवळपास ३०० कलाकारांच्या सहभागातून शिवाजी महाराजांच्या जन्मापासून ते छत्रपती संभाजी महाराज यांच्या बलिदानापर्यंतचा इतिहास रंगमंचावर जिवंत करण्यात आला. शिवकालीन किल्ल्याची उभारलेली भव्य प्रतिकृती आणि नेत्रदीपक प्रकाशयोजना यामुळे संपूर्ण वातावरण ऐतिहासिक काळात नेऊन ठेवणारे ठरले. नाट्यप्रयोगात माता जिजाऊ, शहाजीराजे भोसले, शिवाजी महाराज आणि संभाजी महाराज यांच्या भूमिका साकारणाऱ्या कलाकारांनी प्रभावी अभिनय सादर केला. स्वराज्याची शपथ, किल्ले जिंकण्याच्या मोहिमा, अफजलखान वध, शाहिस्तेखान प्रसंग, आग्र्याहून सुटका, शिवराज्याभिषेक तसेच संभाजी महाराजांची पराक्रमी लढाई आणि औरंगजेबाच्या कैदेत झालेले अमानुष बलिदान हे सर्व प्रसंग प्रेक्षकांना भारावून टाकणारे ठरले.या ऐतिहासिक कार्यक्रमाला मालोजीराजे भोसले, आमदार किसन कथोरे, शिक्षक आमदार ज्ञानेश्वर म्हात्रे, कुळगाव-बदलापूर नगरपालिकेच्या नगराध्यक्षा रुचिता घोरपडे, अंबरनाथ नगरपालिकेच्या नगराध्यक्षा तेजश्री करंजुळे पाटील, उपनगराध्यक्षा प्रियंका दामले, सहाय्यक आयुक्त शैलेश काळे, बदलापूर पूर्व व पश्चिमचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक, तसेच सर्व नगरसेवक उपस्थित होते.

# कचरा संकलन करणारी सुमित एल्कोप्लास्ट कंपनी पुन्हा वादाच्या भोवऱ्यात

## कर्मचाऱ्यांच्या सुरक्षिततेच्या उपाययोजनाबाबत हलगर्जीपणा कर्मचाऱ्यांच्या जीवावर बेतला

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण :** केडीएमच्याच्या कचरा व्यवस्थापनाचे कंत्राट असलेल्या सुमित एल्कोप्लास्ट खाजगी कंपनीचा कारभार पुन्हा एकदा वादाच्या भोवऱ्यात सापडला आहे. कर्मचाऱ्यांच्या सुरक्षिततेबाबत हलगर्जीपणामुळे काशीनाथ पारवे हा कंत्राटी कर्मचारी गंभीर जखमी झाल्याची घटना समोर आली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, रोड स्वीपिंग मशीन साफ करत असताना संबंधित कर्मचाऱ्याचा पाय घसरला. त्यावेळी मशीनच्या सायलेन्सरवर तो पडल्याने काशीनाथ गंभीररीत्या भाजला. जखमी कर्मचाऱ्याला तातडीने जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले असून त्याच्यावर उपचार सुरू आहेत. त्याची प्रकृती चिंताजनक असल्याची माहिती सूत्रांनी दिली. या घटनेनंतर लोकनेते पुंडलीकशेठ म्हात्रे कर्मचारी संघटना आक्रमक झाली आहे. संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी आरोप केला की, कंपनीकडून कर्मचाऱ्यांना आवश्यक सुरक्षा साहित्य जसे की हातमोजे, सुरक्षात्मक बूट, उष्णतारोधक कपडे आदी पुरवले जात नाहीत. योग्य प्रशिक्षण आणि सुरक्षिततेच्या उपाययोजना नसल्यामुळेच ही दुर्घटना घडल्याचा दावा संघटनेने केला आहे. कर्मचाऱ्यांच्या जीवाशी खेळणाऱ्या कंपनीविरोधात कठोर कारवाई झाली पाहिजे. केवळ निवेदन देऊन भागणार नाही. जर तातडीने कारवाई झाली नाही तर तीव्र आंदोलन छेडले जाईल, असा इशारा संघटनेतर्फे देण्यात आला आहे.

दरम्यान, या प्रकरणी सुमित एल्कोप्लास्ट कंपनीकडून अधिकृत भूमिका अद्याप स्पष्ट करण्यात आलेली नाही. केडीएमसी प्रशासनाने या घटनेची चौकशी करून दोषींवर कारवाई करावी, अशी मागणी कर्मचारी व नागरिकांकडून होत आहे. कंत्राटी पद्धतीने काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला असून, यापूर्वीही अशा तक्रारी समोर आल्या होत्या. आता प्रशासन नेमकी कोणती भूमिका घेते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# कल्याणमधील गोविंदवाडी परिसराची महापौर हर्षाली चौधरी यांच्याकडून पाहणी

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण :** कल्याण पश्चिमेतील गोविंद वाडी परिसराची महापौर हर्षाली चौधरी यांनी आज स्वतः पायी फिरून पहाणी केली आणि तेथील रहिवाशी असलेल्या मुस्लिम बांधवांशी थेट संवाद साधत त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या.



## नागरिकांशी साधला थेट संवाद!

त्यांनी यावेळी सदर परिसरातील स्वच्छतेची पाहणी केली, गोविंद वाडी परिसरात ड्रेनेजचे पाणी तुंबत असल्याबाबत पालिका सदस्या समीना शेख यांनी केलेल्या तक्रारीवरून तेथील मलनिस्सारण व्यवस्थेची देखील त्यांनी पाहणी केली आणि सदर तक्रारीचे निराकरण करणे बाबत संबंधित अधिकाऱ्यांना निर्देश दिले.

यावेळी महापालिका सचिव किशोर शेळके, उपायुक्त रामदास कोकरे, मलनिस्सारण विभागाचे कार्यकारी अभियंता प्रसाद सखदेव, काँग्रेस पक्षाच्या गटनेत्या कांचन कुलकर्णी त्यांचे समवेत उपस्थित होत्या.

या समयी नवनिर्वाचित महापौरांचा सत्कार करण्यासाठी नागरिक पुढे सरसावले असता आधी तुमची कामे होऊ द्यात, नंतर सत्कार करा असे सांगत महापौरांनी आपल्या सहृदयतेने नागरिकांची मने जिंकली.

# प्रभाग क्र. ८ मध्ये पाणीपुरवठा सुरळीत न झाल्यास काँग्रेस पक्षातर्फे आंदोलनाचा इशारा

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण :** कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या कल्याण पश्चिमेतील प्रभाग क्र. ८ मध्ये गेल्या काही दिवसांपासून पिण्याच्या पाण्याची तीव्र टंचाई निर्माण झाली आहे. त्यामुळे लवकरात लवकर हा पाणीपुरवठा सुरळीत न झाल्यास काँग्रेस पक्षातर्फे आंदोलन करण्याचा इशारा नगरसेविका कांचन कुलकर्णी यांनी दिला आहे. याबाबत त्यांनी केडीएमसीचे अतिरिक्त आयुक्त हर्षल गायकवाड यांची भेट घेऊन निवेदन दिले आहे.

प्रभाग क्र. ८ या प्रभागात बहुसंख्य मुस्लिम बांधव वास्तव्यास असून सध्या पवित्र रमजान महिना सुरू आहे. अशा परिस्थितीत नागरिकांना गेल्या दहा दिवसांपासून बिना पाण्याचे राहावे लागत असल्यामुळे मोठ्या प्रमाणात अडचणी निर्माण झाल्या आहेत. निवडणुकीच्या काळात या भागात पिण्याचे पाणी मुबलक

## नगरसेविका कांचन कुलकर्णी आक्रमक

प्रमाणात पुरवले जात होते. मात्र निवडणुकीनंतर अचानक पाणीपुरवठा खंडित झाल्यामुळे नागरिकांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे.

पुढील आठ दिवसांच्या आत प्रभाग क्र. ८ मधील पिण्याच्या पाण्याचा पुरवठा सुरळीत व नियमित करावा, अन्यथा काँग्रेस पक्षाच्या वतीने आयुक्त, महापौर तसेच संबंधित अधिकारी यांच्या निवासस्थानाबाहेर तीव्र आंदोलन करण्यात येईल. या आंदोलनातून उद्भवणाऱ्या परिणामांची सर्वस्वी जबाबदारी कल्याण-डोंबिवली महानगरपालिका प्रशासनाची राहील असा इशारा नगरसेविका कांचन कुलकर्णी यांनी दिला आहे.

# गर्भाशयाच्या मुखाच्या कर्करोगावर प्रभावी प्रतिबंध

## १४ वर्षांच्या मुलींसाठी केंद्र सरकारच्या विशेष HPV लसीकरण मोहीमेस महिनाअखेरचा मुहूर्त

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**प्रतिनिधी / दि. २४**

**देशातील किशोरवयीन मुलींच्या आरोग्य संरक्षणासाठी केंद्र सरकार या महिन्याच्या अखेरीस १४ वर्षांच्या मुलींसाठी विशेष HPV (ह्युमन पॅपिलोमा व्हायरस) लसीकरण मोहीम सुरू करणार असल्याची माहिती केंद्रीय आरोग्य मंत्रालयातील सूत्रांनी दिली आहे. जागतिक आरोग्य संघटना अंतर्गत कार्यरत स्ट्रॅटेजिक अॅडव्हायझरी ग्रुप ऑफ एक्सपर्ट्स ऑन इम्युनायझेशन (SAGE) यांनी केलेल्या शिफारसीनुसार सरकारने एकाच डोसची पद्धत (Single-Dose Regimen) स्वीकारण्याचा निर्णय घेतला आहे.**

**या मोहिमेच्या पहिल्या ९० दिवसांमध्ये जन्मतारखेनुसार १४ वर्षे पूर्ण झालेल्या मुलींना सरकारी आरोग्य केंद्रांवर ही लस मोफत उपलब्ध करून दिली जाणार आहे. यासोबतच, पात्र मुली किंवा त्यांच्या पालकांना यू-विन (U-WIN) पोर्टलवरून स्लॉट बुक करून जवळच्या आरोग्य केंद्रात लसीकरण करता येणार आहे. ही संपूर्ण प्रक्रिया कोरोना काळातील कोविन पोर्टलप्रमाणेच सुलभ आणि डिजिटल असणार आहे.**

**दरवर्षी १.१५ कोटी मुली पात्र**

**आरोग्य मंत्रालयाच्या माहितीनुसार, दरवर्षी देशात वयाची १४ वर्षे पूर्ण करणाऱ्या सुमारे १.१५ कोटी मुली HPV लसीकरणासाठी पात्र ठरणार आहेत. अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले की, "१४ वर्षांचे वय लसीकरणासाठी निवडण्यामागे ठोस वैज्ञानिक पुरावे आहेत. या वयात दिलेली लस सर्वाधिक मजबूत आणि दीर्घकाळ टिकणारे संरक्षण देते."**




**■ गार्डासिल लसीचा वापर; किमान दोन वर्षे अंमलबजावणी**

या राष्ट्रीय मोहिमेत सुरुवातीला एमएसडी कंपनीची गार्डासिल ही HPV लस वापरण्यात येणार आहे. किमान पुढील दोन वर्षे या लसीचा वापर केला जाणार असल्याचे सूत्रांनी सांगितले. दरम्यान, सीरम इन्स्टिट्यूट ऑफ इंडिया यांनी विकसित केलेल्या स्वदेशी 'Cervavac' लसीला अद्याप WHOची मंजुरी मिळालेली नाही. तसेच, Cervavac वापरून एकाच डोसची परिणामकारकता सध्या पुराव्यांवर सिद्ध झालेली नसल्याने, तिच्या वापराबाबतचा निर्णय पुढील टप्प्यात घेतला जाईल, असेही अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले.

**■ GAVI कडून डोस पुरवठा**

HPV लसींचा पुरवठा सध्या GAVI व्हॅक्सिन अलायन्स मार्फत केला जाणार आहे. GAVI भारताला एकूण २.६ कोटी डोस पुरवणार असून, त्यापैकी १ कोटी डोस आधीच देशात दाखल झाले आहेत. उर्वरित डोस या वर्षात आणि पुढील वर्षभरात टप्प्याटप्प्याने उपलब्ध होतील.

**■ HPV लस कर्करोग कशी रोखते?**

वैद्यकीय संशोधनानुसार, सुमारे ८५ टक्के गर्भाशयाच्या मुखाचे कर्करोग हे HPV च्या दीर्घकालीन संसर्गामुळे होतात. भारतात महिलांमध्ये आढळणाऱ्या कर्करोगांमध्ये गर्भाशयाच्या मुखाचा कर्करोग दुसऱ्या क्रमांकावर आहे. दरवर्षी अंदाजे १.२५ लाख महिलांना हा कर्करोग होतो आणि त्यापैकी ७५ हजार महिलांचा मृत्यू होतो. HPV लसीकरणामुळे हा संसर्ग रोखता येतो आणि त्यामुळे भविष्यात कर्करोगाचा धोका लक्षणीय प्रमाणात कमी होतो, असा तज्ज्ञांचा ठाम निष्कर्ष आहे.

**■ महिला आरोग्य**
**■ संरक्षणाकडे मोठे पाऊल**

केंद्र सरकारची ही विशेष HPV लसीकरण मोहीम महिला आरोग्य संरक्षणाच्या दृष्टीने ऐतिहासिक पाऊल मानली जात आहे. किशोरवयातच लसीकरण झाल्यास पुढील आयुष्यात गर्भाशयाच्या मुखाच्या कर्करोगावर प्रभावी नियंत्रण मिळवता येईल, असा विश्वास आरोग्य तज्ज्ञांनी व्यक्त केला आहे.




# ठाण्यात दशावतार नाट्य महोत्सव

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे** : महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे प्रयत्नाने व त्याचे मार्गदर्शनाखाली शेती, पर्यटन, मत्स आणि निसर्ग, भाषा अश्या अनेक क्षेत्रात आपल कोकण जागतिक कीर्तीचे व्हावं यासाठी सांस्कृतिक कार्य विभाग व सांस्कृतिक कार्य संचालनालय, मुंबई महाराष्ट्र शासनाच्या वतीने कोपरी पांचपाखाडी विधानसभा मतदार संघात प्रभाग क्र १४ मध्ये दि २५ फेब्रुवारी ते १ मार्च २०२६ या कालावधीत सलग ५ दिवसाचा दशावतार नाट्य महोत्सव २०२६ दररोज सायंकाळी ६.३० ते रात्री १०. या वेळेत स्वातंत्र्यवीर सावरकर नगर येथील सचिन तेंडुलकर स्टेडियम, महात्मा फुले नगर, येथे उत्साहात साजरा होणार आहे. यामध्ये बुधवार, २५ फेब्रुवारी रोजी श्री कलेश्वर दशावतार नाट्य मंडळ, गुरुवार,२६ फेब्रुवारी रोजी अमृतनाथ पारंपरिक दशावतार नाट्य मंडळ, शुक्रवार दि.२७ फेब्रुवारी रोजी खानोलकर पारंपरिक दशावतार नाट्य मंडळ, खानोली, शनिवार २८ फेब्रुवारी रोजी सिध्दीविनायक दशावतार नाट्य मंडळ, डोंबिवली तर रविवार, दि. ०१ मार्च रोजी ओंकार पारंपरिक लोककला दशावतार नाट्य मंडळ या प्रसिद्ध ५ दशावतार नाट्य मंडळींची नाटके होणार आहेत. यासाठी मोफत प्रवेश आहे. तरी रसिक, प्रेक्षकांनी सहकुटुंब सहपरिवार यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाचा लाभ घ्यावा असे आवाहन स्थानिक नगरसेवक दिलीप चंद्रकांत बारटक्के, नगरसेवक राकेश शिंदे, नगरसेविका कांचन चिंदरकर, शितल ढमाले यांनी केले आहे.

# संत गाडगेबाबा जयंतीनिमित्त धार्मिक स्थळांवर स्वच्छता मोहीम




दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**डोंबिवली :** महापालिका महापौर हर्षाली थवील-चौधरी यांचे संकल्पनेतून तसेच महापालिका आयुक्त अभिनव गोयल यांचे निर्देशानुसार व अतिरीक्त आयुक्त हर्षल गायकवाड यांचे मार्गदर्शनानुसार दि.23 फेब्रुवारी 2026 रोजी संत गाडगेबाबत यांच्या जयंती दिनी व हिंद की चादर अभियानानिमीत्त महापालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागामार्फत कल्याण डोंबिवली महापालिका क्षेत्रातील मंदिरे व धार्मिक स्थळे या ठिकाणी स्वच्छता मोहिम राबविण्यात आली. या मोहिमेअंतर्गत सुमारे 127 धार्मिक स्थळांची संपूर्ण स्वच्छता करण्यात आलेली असून या स्वच्छता मोहिमेत धार्मिक स्थळांचे ठिकाणी संकलित झालेले अंदाजे 1000 कि.ग्रॅ. निर्माल्य पुढील प्रक्रीयेकरीता गणेश मंदिर संस्थान, डोंबिवली येथील खत निर्मीती प्रकल्प येथे पाठविण्यात आले, अशी माहिती घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपायुक्त रामदास कोकरे यांनी दिली आहे.

# भिवंडीत मंदिरासमोर सांडपाणी : पादचारी व भाविकांमध्ये संतापाची लाट

दै.ठाणे जीवनदीप वार्ता



**शहरात रमजान पवित्र महिना सुरु असल्याने शहरातील सर्व नागरिकांनी स्वच्छता ठेवावी,असे आवाहन पालिका आयुक्त अनमोल सागर यांनी केले आहे. मात्र महानगरपालिकेचे काही अधिकारी, कर्मचारी,निरीक्षक आणि ठेकेदार कामचुकारपणा करीत असल्याने शहरातील नागरिकांमध्ये संताप व्यक्त केला जात आहे. नवनिर्वाचित महापौर नारायण चौधरी यांनी लक्ष द्यावे,अशी मागणी केली जात आहे.**

**भिवंडी** : भिवंडी शहरातील मुख्य बाजारपेठेतील नवीचाळ येथील सुप्रसिद्ध महालक्ष्मी प्रवेशद्वाराबाहेर महा पालिकेच्या रस्त्यालगत असलेले गटार गेल्या महिनाभरापासून तुंबल्याने गटाराचे सांडपाणी रस्त्यावर आले असुन त्यामुळे सर्वत्र दुर्गंधी पसरली आहे.मंदिरात व बाजारात खरेदी साठी येणारे व जाणाऱ्या पादचारी नागरिक, महिला आणि भाविकांना प्रचंड मनस्ताप करावा लागत आहे. या मंदिरालगत दोन जैन मंदिरे आहेत.त्यामुळे स्थानिक नागरिकांनी महापालिका प्रशासनाकडे लेखी तक्रारी करूनही त्याकडे अधिकारी वर्ग दुर्लक्ष करीत आहे.या घटनेची दखल घेऊन भिवंडी मनपा आयुक्त अनमोल सागर यांनी स्वच्छता विभागाचे अधिकारी आणि आरोग्य निरीक्षक यांच्यावर कारवाई करण्याची मागणी स्थानिक नागरिक व शिवसैनिकांकडून केली जात आहे.

भिवंडी शहरातील विविध भागात मोठ्या प्रमाणात नागरी समस्या निर्माण झाल्या आहेत. त्यामुळे सर्वसामान्य नागरिक त्रस्त झाले आहेत.नवीन निवडून आलेल्या काही नगरसेवकांनी आपल्या वार्डात व प्रभागात समस्यांचे निराकरण करण्याकरिता पुढाकार घेतला आहे. तर काहींनी सराईतपणे दुर्लक्ष केल्याने नागरी समस्या दिवसेंदिवस वाढत आहे. शहरात विविध धार्मिक सणाला सुरुवात झाली असून नागरिक खरेदीसाठी मुख्य बाजारपेठेकडे येत आहेत. या परिसरात असलेल्या नवीचाळ भागात सुप्रसिद्ध महालक्ष्मी मंदिर व दोन जैन मंदिरे आहेत.येथील रस्ता वारंवार बनवून देखील खराब झालेला आहे. रस्त्यालगत असलेली गटारे साफ न केल्याने तुंबली आहेत. त्याचे सर्व सांडपाणी रस्त्यावर आल्याने सर्वत्र दुर्गंधी पसरली आहे. त्यामुळे येथील रहिवासी महिला, नागरिक,पादचारी आणि मंदिरात जाणाऱ्या भाविकांना दुर्गंधीचा सामना करावा लागत आहे.तसेच गटार लगत विद्युत केबल असुन पाण्यामुळे मोठी दुर्घटना होण्याची शक्यता आहे या बाबत स्थानिक नागरिकांनी महापालिका प्रशासन व आरोग्य स्वच्छता विभागाच्या अधिकाऱ्यांकडे तक्रारी केल्या आहेत. तरी सुद्धा दुर्लक्ष्य केले जात असल्याने नागरिकांत संतापाची लाट पसरली आहे. शहरात मुस्लिम बांधवांचा पवित्र रमजान महिना सुरु झाल्याने दररोज शेकडोच्या संख्येने महिलावर्ग बाजारपेठेत खरेदीसासाठी येत आहेत. त्यांना साचलेल्या दुर्गंधीयुक्त सांडपाण्यातुन जावे लागत आहे. त्यामुळे महापालिका आयुक्तांनी तातडीने या परिसरात विशेष स्वच्छता मोहीम राबवून नादुरुस्त गटारे स्वच्छ करून नागरिकांना सुविधा उपलब्ध करून द्यावी,अशी मागणी स्थानिक शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांनी केली आहे.

# केडीएमसीतर्फे महिला दिनानिमित्त कर्तृत्ववान महिलांचा सन्मान

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : ८ मार्च २०२६ रोजीच्या जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून कल्याण डोंबिवली महानगरपालिका कार्यक्षेत्रातील कर्तृत्वान महिलांचा सत्कार करण्यात येणार आहे. या कार्यक्रमा करिता कल्याण डोंबिवली महानगरपालिका कार्य क्षेत्रातील सर्व महिलांनी आपण केलेल्या कामगिरी बाबतची संपूर्ण माहिती कागदपत्रे अर्जा सहित महिला व बालकल्याण विभाग, कल्याण डोंबिवली महानगपालिका येथे दिनांक २७ फेब्रुवारी २०२६ पर्यंत जमा करण्याचे आवाहन महिला व बालकल्याण विभागाच्या उपायुक्त कांचन गायकवाड यांनी केले आहे.

# ठाणे- कल्याण डोंबिवलीसह मुंबई महानगर प्रदेशात ५० पेक्षा अधिक जलस्रोतांची स्वच्छता

दै.ठाणे जीवनदीप वार्ता



**कल्याण** : प्रोजेक्ट अमृत अंतर्गत'स्वच्छ जल, स्वच्छ मन' या अभियानाच्या चौथ्या टप्प्याचे भव्य आयोजन सतगुरू माता सुदीक्षाजी महाराज आणि निरंकारी राजपिता रमितजी यांच्या मार्गदर्शनाखाली देशातील २५ राज्ये व केंद्रशासित प्रदेशांतील ९३० शहरांमधील १६०० हून अधिक ठिकाणी रविवारी २२ फेब्रुवारी रोजी यशस्वीरीत्या करण्यात आले. सुमारे १२ लाख स्वयंसेवकांनी यात सहभाग नोंदविला. हा उपक्रम केवळ पर्यावरणीय प्रयत्न नव्हता; तर अध्यात्म, सेवा आणि सामाजिक बांधिलकी यांचा सुंदर संगम होता. या माध्यमातून जनमानसात कर्तव्यभाव आणि जागरूकतेची भावना अधिक दृढ होण्यास मदत होईल.

या महा अभियाना अंतर्गत ठाण्यातील ब्रह्माळा तलाव, तुर्फेपाडा तलाव (ब्रह्मांड), मुंब्रा येथील खिडकाळेश्वर महादेव मंदिर, डोंबिवली खाडी साईड, गणपती तलाव (गोग्रासवाडी), खदान तलाव (उल्हासनगर), महागणपती तलाव (टिटवाळा), माऊली तलाव (सोनारपाडा), कान्हेरे गांव तलाव, वारली देवी तलाव (भिवंडी), गौरीपाडा तलाव व आदिवली तलाव (कल्याण), सावर्णे काळू नदी किनारा, पाचवा मैल (भिसोळ) नदी किनारा, कसारा सरोवर, गणेश घाट (भातसई), गणेश घाट (नवापाडा-ठाकुर्ली) तसेच गंगा देवस्थान (शहापुर), खेनी गांव इत्यादि ठिकाणांची सफाई करण्यात आली. या व्यतिरिक्त मुंबई, नवी मुंबई व वसई-विरार भागामध्येही अनेक चौपाट्या, सरोवरे, जेट्टी, नदी किनारे व तलावांची स्वच्छता करण्यात आली. या उपक्रमामध्ये ठाणे, डोंबिवली, उल्हासनगर महानगरपालिका तसेच बदलापुर नगरपालिकेच्या स्वच्छता विभागांनी मोलाचे सहकार्य केले.

यावेळी दिल्ली येथे आयोजित विशेष सत्संग कार्यक्रमात सतगुरू माता सुदीक्षाजी महाराज यांनी अमृतमय विचार व्यक्त करताना सांगितले की, बाबाजींची शिकवण ही केवळ स्मरण करायची नसून ती जीवनात अंगीकारण्यासाठी आहे. खरी श्रद्धांजली ही शब्दांनी नव्हे, तर कृतीतून अर्पण केली जाते. आपण त्यांच्या अनुयायी असल्याचा दावा करीत असू, तर प्रेम, सेवा, करुणा आणि समदृष्टी यांसारख्या मूल्यांचा स्वीकार आपल्या दैनंदिन जीवनात झाला आहे का, याचे आत्मपरीक्षण आवश्यक आहे. बाबा हरदेव सिंहजी महाराज यांचे संपूर्ण आयुष्य मानवकल्याणासाठी समर्पित होते. सेवा, सुमिरण आणि सत्संग हेच जीवनाचे अधिष्ठान असल्याचा त्यांनी दिलेला संदेश आजही तितकाच सुसंगत आहे. भक्ती ही केवळ बोलण्यापुरती मर्यादित न राहता ती आचरणात दिसली पाहिजे, असे त्यांनी अधोरेखित केले.

# वेद हॉस्पिटलमध्ये मिनिमल इंव्हीसिव कार्डीअक सर्जरी यशस्वी



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : कल्याण भिवंडी रोडवर असलेल्या वेद हॉस्पिटलमध्ये मिनिमल इंव्हीसिव कार्डीअक सर्जरी यशस्वीरित्या पार पडली आहे. डॉ. सागर केदारे यांच्या कार्डीअक सर्जरी टीमने वेद हॉस्पिटलमध्ये मिनिमल इंव्हीसिव कार्डीअक सर्जरी जी छोट्याश्या 5 सेंटीमीटर इंसिजेनने बायपास सारखी मोठी शस्त्रक्रिया पार पाडली आहे. हि कल्याण डोंबिवली परिसरातील पहिली शस्त्रक्रिया आहे. या शस्त्रक्रियेनंतर रुग्णाला तिसऱ्या दिवशीच घरी सोडण्यात आले असून नियमित तपासणीसाठी देखील येत आहे. या शस्त्रक्रियेसाठी वेळ कमी लागत असून मोठ्या शस्त्रक्रियेत जास्त चिरफाड करावी लागते मात्र या शस्त्रक्रियेत मोठी चिरफाड न करता शस्त्रक्रिया करण्यात येत असल्याची माहिती डॉ. सागर केदारे यांनी दिली.

# ठाणे ग्रामीण कार्यक्षेत्रात स्वतंत्र वाहतूक विभागासाठी 'अखिल भारतीय ब्राह्मण महासंघा'ची मागणी

दै.ठाणे जीवनदीप वार्ता



**कल्याण** : भरधाव डंपरच्या धडकेने नुकतेच टिटवाळा हादरले आणि शहरातील वाहतूक व्यवस्थेतील त्रुटी पुन्हा एकदा ठळकपणे समोर आल्या. वाढती जड वाहनांची वर्दळ, अपुरे नियंत्रण आणि मनुष्यबळाची कमतरता यामुळे अपघातांचा धोका वाढत असल्याची भावना नागरिकांत तीव्र झाली आहे. या पार्श्वभूमीवर अखिल भारतीय ब्राह्मण महासंघ, टिटवाळा शहर यांच्या वतीने अॅड. जितेंद्र जोशी यांनी स्वतंत्र वाहतूक विभाग स्थापन करण्याची ठाम आणि व्यापक मागणी केली आहे.

नुकत्याच झालेल्या डंपर अपघातात वाहनांचे नुकसान होऊन वाहतूक कोंडी निर्माण झाली. या

## डंपर अपघाताने दिला इशारा

घटनेने केवळ टिटवाळ्यातीलच नव्हे तर संपूर्ण ठाणे ग्रामीण परिसरातील वाहतूक व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह उभे केले आहे. वाढत्या शहरीकरणामुळे आणि जड वाहनांच्या सततच्या रहदारीमुळे प्रभावी व समर्पित वाहतूक शाखेची आवश्यकता प्रकर्षाने जाणवत आहे. महत्वाचे म्हणजे, ही मागणी केवळ टिटवाळा किंवा कल्याण तालुका पोलीस ठाण्यापुरती मर्यादित नसून, ठाणे ग्रामीण पोलीस अधीक्षक कार्यालय व त्याअंतर्गत येणाऱ्या सर्व पोलीस ठाण्यांसाठी स्वतंत्र वाहतूक विभाग स्थापन करण्याची आहे. सध्या उपलब्ध पोलीस यंत्रणेवर कायदा-सुव्यवस्था आणि वाहतूक नियंत्रण या दोन्ही जबाबदाऱ्या असल्याने कार्यक्षमतेवर परिणाम होत असल्याचे मत व्यक्त होत आहे. या मागणीचा पाठपुरावा करत अॅड. जोशी यांनी पोलीस महासंचालक, महाराष्ट्र यांची सुनियोजित भेट मिळावी यासाठी अधिकृत अर्ज सादर केला आहे. भेट निश्चित झाल्यानंतर ठाणे ग्रामीण कार्यक्षेत्रासाठी स्वतंत्र वाहतूक शाखा, आवश्यक मनुष्यबळ, विशेष पथके आणि जड वाहनांवर कठोर नियंत्रण यासाठी ते प्रखरपणे भूमिका मांडणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

# रिंगरोडवर अपघात; दुचाकी चालक जखमी वाहनचालक अटकेत

दै.ठाणे जीवनदीप वार्ता



**खडकपाडा पोलिसांची तत्पर कारवाई**

**अपघात करणाऱ्या अज्ञात चारचाकी वाहनाच्या चालकाने जखमीला कोणतीही वैदयकीय मदत न करता तेथुन पळुन गेलेला होता.**

**कल्याण** : कल्याण पश्चिमेतील रिंगरोडवर भरधाव वेगाने चारचाकी गाडी चालवून दुचाकी चालकास मागून धडक दिल्याने दुचाकीचालक गंभीर जखमी झाला आहे. याप्रकरणी खडकपाडा पोलीसांनी गुन्हा दाखल करत संबंधित वाहनचालकाला अटक केली असून चारचाकी गाडी ताब्यात घेतली आहे. १८ फेब्रुवारी रात्री ११ च्या सुमारास कल्याण पश्चिमेतील भंडारी चौकाकडे जाणाऱ्या नवीन वडवली रोडवर एका अज्ञात चारचाकी वाहन चालकाने भरधाव वेगात वाहन चालुवन अॅक्टिवा चालकास मागुन धडक दिल्याने या दुचाकी चालकाच्या डोक्यास व उजव्या हातास गंभीर दुखापत झाली. याप्रकरणी जखमी विकास कुंभार यांचा मुलगा श्रेयश कुंभार याने खडकपाडा पोलीस स्टेशन येथे दिलेल्या तकारी वरून खडकपाडा पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल झालेला आहे. हा अपघात करणाऱ्या अज्ञात चारचाकी वाहनाच्या चालकाने जखमीला कोणतीही वैदयकीय मदत न करता तेथुन पळुन गेलेला होता. या गुन्हयातील अज्ञात चारचाकी वाहना बाबत कोणताही पुरावा उपलब्ध नसतांना सदर गुन्हयातील अज्ञात अपघात ग्रस्त वाहनाचा सीसीटीव्हीच्या आधारे, प्रत्यक्षदर्शी साक्षीदार व तांत्रीक पुराव्याचे आधारे ४८ तासाच्या आत खडकपाडा पोलीस ठाण्यातील डी बी स्टाफ, यांनी आरोपीचा शोध घेवुन 23 वर्षीय आरोपी मनिष सतीष मनवानी, गाडी कमांक एम एच ०५ जी डी ११११ सह ताब्यात घेतलेले आहे. तसेच इतर दोन गाडया अशा तीनही गाडयांनी नवीन वडवली रोडवर रात्रीच्या वेळी स्टंटबाजी व रेसींग करीत असतांना हा अपघात घडल्याचे तपासात निष्पन्न झालेले आहे.

हि कारवाई पोलीस उप आयुक्त अतुल झेंडे, सहा. पोलीस आयुक्त कल्याणजी घेटे, पोलीस निरीक्षक मारूती आंधळे यांच्या मार्गदर्शनाखाली खडकपाडा पोलीस स्टेशन येथील तपास पथकाचे सपोनि विजय गायकवाड, पोउनि भूषण देवरे, सपोउनि सुधिर पाटील, पोहवा भामरे, बुधकर, भोईर, पोशि बगाड, पाटील, धुळगंड यांनी केलेली आहे.

खडकपाडा पोलीस स्टेशन येथे इतर दोन भरधाव वेगात वाहन चालवणाऱ्या व स्टंटबाजी करणाऱ्या इतर दोन वाहन कमांक १) एम एच ०५ ए एक्स ७०११, २) एम एच ०४ एफ एम ९९९ या वाहनां वरील चालकांवर कायदयाच्या विविध कलमान्वये स्वतंत्र गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.




# दिवा रेल्वे फाटकावरील उड्डाणपूल तातडीने पूर्ण करण्यासाठी रेल्वे मंडळाचा हस्तक्षेप

दै.ठाणे जीवनदीप वार्ता
प्रतिनिधी / दि. २४




**मुंबई :** मुंबई उपनगरी रेल्वे मार्गावर मेल-एक्स्प्रेस आणि मालवाहतूक रेल्वेगाड्यांच्या वेळापत्रकाला अडथळा निर्माण करणाऱ्या दिवा रेल्वे फाटकावरून रेल्वे मंडळाने हस्तक्षेप सुरू केला आहे. १३ वर्षांपासून रखडलेला उड्डाणपूल अद्याप अपूर्ण असल्यामुळे फाटक सुरू आहे, आणि रेल्वे मार्गावर गर्दी वाढली आहे.

सन २०१२-१३ मध्ये पुलाला मंजुरी मिळाली होती. रेल्वे रुळांवरील पुलाचे काम पूर्ण झाले असून, त्याला जोडणाऱ्या मार्गांचे काम अपूर्ण राहिले आहे. छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस ते कल्याण या अतिशय वर्दळीच्या मार्गावर दिवा फाटक सुरू असल्याने वेळापत्रकावर मोठा परिणाम होत आहे. राज्य सरकारच्या मुख्य सचिवांना मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी या प्रकल्पाची तातडीने दखल घेण्याची सूचना दिली आहे. १ जुलै २०२५ रोजी राज्य सरकारने पाठपुरावा करत असून, राज्यातील ३९ रेल्वे उड्डाणपूल (आरओबी) आणि १० रुळांखालील मार्ग (आरयूबी) प्रकल्पांवर काम चालू असल्याचे नमूद केले आहे. रुळांवरील भागाचे काम मार्च 2024मध्ये पूर्ण झाले आहे. मात्र, त्याला जोडणाऱ्या मार्गाचे काम ठाणे महापालिकेकडून करण्यात येत आहे. भूसंपादनाच्या प्रश्नामुळे हे जोडमार्ग रखडले आहेत. या मार्गावर सतत वाहतूक सुरू असते. अशा स्थितीत रेल्वे फाटक बंद करून वाहतूक सुरळीत करण्यासाठी रेल्वे उड्डाणपूल लवकर सुरू होणे आवश्यक आहे. राज्य आणि महापालिकेच्या स्तरावर रेल्वे पूलाच्या जोडरस्त्यांसाठी आवश्यक असलेल्या भूसंपदनासाठी तातडीने सूचना देऊन हा प्रश्न निकाली काढावा.

Printed by SIDDHAKALA PRINT SOLUTION LLP Published by GHODVINDE RAVINDRA NARAYAN on behalf of GHODVINDE RAVINDRA NARAYAN,
Printed at Thane and published at Building No-B-24, Room no-9, Gholap Nagar, Murbad Road, Near Anupam Nagar, Kalyan (West). Editor GHODVINDE RAVINDRA NARAYAN.
Contact No. - 908266 4781 / 9619188558 E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024